**<u>राज्यातील शासकीय तसेच १०० टक्के अनुदानित खाजगी शाळातील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत--</u>**
**प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्रमांक वैखप्र-१०१२/(५२२/१५)/टीएनटी-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१५.

**<u>वाचा :-</u>** (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-१०१२/ (१५/१२)/माशि-५, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२.
(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०१५/ प्र.क्र.८२/ २०१५/राकावि-२, दिनांक २४ ऑगस्ट, २०१५.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र राज्यातील शासकीय, सरकारी तसेच १०० टक्के अनुदानित खाजगी प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सैनिकी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारांवर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारावर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) च्या मर्यादेत प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधीत प्रशासकीय विभागाकडे सादर केली जातात. सद्य:स्थितीत औषधाच्या किंमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादिचा विचार करुन शासकीय कर्मचारी/ अधिकाऱ्यावर होणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना मंजूरी देण्याच्या वित्तीय अधिकारात संदर्भाधिन दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आला आहे त्यास अनुलक्षून वर नमूद केलेल्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वैद्यकीय देयकास मंजूरी देण्यासाठी वित्तीय अधिकारामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय देयके मंजूर करण्याचे शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेले अधिकार अधिक्रमीत करुन महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून वित्तीय अधिकारात सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या सुधारणेप्रमाणे खाजगी १०० टक्के अनुदानित संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अधिकारी | पूर्वीचे अधिकार | सुधारीत अधिकार |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | रुपये १,००,०००/- | रुपये २,००,०००/-पर्यत |

२. रुपये २,००,०००/- ते रुपये ३,००,०००/-रकमेची देयके अदा करण्याच्या अधिकाराबाबत वेगळयाने आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. तोपर्यत रुपये २,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना राहतील.

३. वर नमूद केल्याप्रमाणे “विभाग प्रमुख” स्तरावर रुपये २,००,०००/- पर्यतची वैद्यकीय देयकांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीची काटेकोरपणे तपासावी व नंतरच मंजूरी देण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय या निर्णयाच्या दिनांकाला प्रलंबित प्रकरणांनाही लागू राहिल.

५. सदर शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने काढलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०९१८१६३२५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.09.18 17:03:07 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई (२ प्रती)
४) मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
५) मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
८) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
९) प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१०) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
११) वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१६) संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१८) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद
१९) सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
२०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२१) सहसंचालक, अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२३) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२४) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालये (सर्व)
२५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
२६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/ निवड नस्ती (टीएनटी-५)